# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 15 January 2026
## Time 18.10 to 18.20
## Language Marathi
## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
## प्रादेशिक बातम्या
## दिनांक – १५ जानेवारी २०२६ सायंकाळी ६.१०

****

- राज्यात २९ महापालिकांसाठीची मतदान प्रक्रिया शांततेत पूर्ण–उद्या मतमोजणी
- प्रभागनिहाय एकापेक्षा अधिक मतदानाबाबत मतदारांमध्ये उत्सुकता
- छत्रपती संभाजीनगर इथं बोगस मतदान प्रकरणी आठ महिलांना अटक
- मतदारांच्या बोटाची शाई पुसणं अशक्य–निवडणूक आयोगाचा निर्वाळा

आणि

- सिकलसेल तपासणीच्या ‘अरुणोदय’ मोहिमेला आजपासून सुरूवात

****

राज्यातल्या २९ महानगरपालिकांसाठीची मतदान प्रक्रिया काही किरकोळ अपवाद वगळता शांततेत पार पडली. राज्यभरात दुपारी साडे तीन वाजेपर्यंत सुमारे ४१ पूर्णांक १३ टक्के मतदान झालं. सर्व महापालिकांच्या ८९३ प्रभागांतल्या दोन हजार ८६९ नगरसेवक पदांसाठी निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या १५ हजार ९३१ उमेदवारांचं राजकीय भवितव्य इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रात बंद झालं. या सगळ्या मतदानाची उद्या मोजणी होणार असून, मतदारांनी कोणाला कौल दिला आहे, हे उद्या दुपारपर्यंत स्पष्ट होण्याची शक्यता आहे. दरम्यान, राज्यात सर्वच टपाली मतपत्रिकांच्या पेट्या उद्या मतमोजणीपूर्वी अभिरक्षा कक्षातून बाहेर काढण्याचे आदेश निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिले आहेत. टपाली मतपत्रिकांचं प्रभागनिहाय विलगीकरण देखील त्याचवेळेला करण्यात येणार असल्याचं निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी स्पष्ट केलं आहे.

****

मराठवाड्यातल्या पाच महापालिकांपैकी छत्रपती संभाजीनगर इथं दुपारी साडे तीन वाजेपर्यंत ४३ पूर्णांक ६७ टक्के मतदान झालं होतं. जालना इथं ४६ टक्के, परभणी इथं ५५ पूर्णांक ५९ टक्के, लातूर ४३ पूर्णांक ५८ टक्के, नांदेड इथं दुपारी साडे तीन वाजेपर्यंत सुमारे ४५ टक्के मतदानाची नोंद झाली.

नांदेड महापालिकेच्या २० प्रभागातील ८१ जागांसाठी शांततेत मतदान झाल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनी दिली. सायंकाळी पाच वाजेनंतर मतदान केंद्रावर मतदारांच्या मोठ्या रांगा लागल्याचं दिसून आलं. शहरात सर्वाधिक ५१ टक्के मतदान हैदरबाग प्रभागात तर पाच जागा असलेल्या सिडको प्रभागात दुपारपर्यंत सर्वात कमी सुमारे ३५ टक्के मतदान झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

परभणी इथे १०२ वर्षीय मतदार दादाराव देशमुख यांनी मतदान केंद्रावर येऊन आपला मतदानाचा हक्क बजावला. लोकशाहीसाठी सर्व नागरिकांनी मतदान करण्याचं आवाहन देशमुख यांनी केलं. दरम्यान, परभणी इथं प्रभाग क्रमांक चार मधल्या एका मतदान केंद्रावर मतदान यंत्रात बिघाड झाला होता, मात्र तातडीनं युनिट दुरूस्ती केल्यानं मतदान प्रक्रिया सुरळीत झाली.

सर्वच महापालिकांसाठी प्रभागनिहाय तीन, चार किंवा पाच मतदान करण्याची ही पहिलीच वेळ होती, प्रभागनिहाय मतदानाबाबत मतदारांमध्ये उत्सुकता दिसून आली, छत्रपती संभाजीनगर इथली नवमतदार गायत्री कुलकर्णी हिने पहिल्यांदाच मतदान केलं, प्रभागरचनेनुसार एकापेक्षा अधिक नगरसेवक निवडीसाठी मतदान करण्याचा आपला अनुभव तिने या शब्दांत सांगितला –

**बाईट – गायत्री कुलकर्णी**

जालना इथं महापालिकेची ही पहिलीच निवडणूक आहे. सकाळी मतदानाला सुरुवात होताच वयोवृद्ध मतदारांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. जालना इथले आकाश गायकवाड यांनी या निवडणुकीत मतदानाचा अनुभव या शब्दांत व्यक्त केला –

**बाईट – आकाश गायकवाड**

****

धुळे शहरातील एका मतदान केंद्रावर मतदान यंत्राची तोडफोड करण्यात आल्याची घटना घडली. पोलीस आणि निवडणूक प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी जाऊन परिस्थिती नियंत्रणात आणली.

नाशिक इथं काही ठिकाणी पैसे वाटपाच्या तक्रारीनंतर नागरिकांनी गर्दी केली. गर्दी आटोक्यात आणण्यासाठी पोलीसांना सौम्य बळाचा वापर करावा लागला. एका उमेदवाराची दुचाकीही पोलिसांनी जप्त केली.
अहिल्यानगर इथेही बनावट ओळखपत्र दाखवून मतदानाचा प्रयत्न करणाऱ्या इसमांना पोलिसांच्या ताब्यात देण्यात आल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

छत्रपती संभाजीनगर इथं आठ बोगस महिला मतदारांना पोलिसांनी अटक केली. या सर्व महिला मतदानाचा प्रयत्न करत असताना, हा प्रकार उघड झाला. या सर्व महिलांना सिटी चौक पोलिसांनी अटक केली.
दरम्यान, मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त करूनही १५५ कर्मचारी आज कर्तव्यावर हजर राहिले नाहीत. या सर्व कर्मचाऱ्यांविरोधात छत्रपती संभाजीनगर महापालिकेने गुन्हा दाखल केला आहे.

****

राज्यात आज सकाळी मतदानाला सुरुवात झाल्यानंतर बोटाला लावलेली शाई पुसून पुन्हा मतदान केलं जात असल्याच्या बातम्या काही माध्यमातून प्रसारित झाल्या होत्या. राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी या सगळ्या बातम्या भ्रामक असल्याचं सांगत, बोटाला लावलेली शाई पुसता येणं शक्य नसल्याचं नमूद केलं. ते म्हणाले –

**बाईट – राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे**

****

राज्यात सिकलसेलचा प्रादुर्भाव जास्त असलेल्या २१ जिल्ह्यांमध्ये ‘अरुणोदय’ या विशेष तपासणी मोहिमेला आजपासून सुरूवात झाली. २७ फेब्रुवारीपर्यंत चालणाऱ्या या मोहिमेत सिकलसेलचं लवकर निदान आणि उपचारांचं महत्त्व सांगितलं जाणार आहे. २०१९ ते ऑक्टोबर २०२५ पर्यंत जवळपास दीड कोटी लोकांची तपासणी करण्यात आली होती. त्यापैकी बहुतेक रुग्ण आदिवासी बहुल जिल्ह्यांतील असल्याचे आरोग्य विभागाकडून सांगण्यात आलं आहे.

****

७७व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्ली इथं होणाऱ्या मुख्य ध्वजारोहण तसंच पथसंचलन सोहळ्यासाठी युरोपियन परिषदेचे अध्यक्ष अँटोनियो लुईस सँटोस दा कोस्टा आणि युरोपियन आयोगाच्या अध्यक्षा उर्सुला फॉन डेर लेयन हे यंदा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. हे दोन्ही नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निमंत्रणावरून येत्या २५ तारखेपासून तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर येत आहेत. २७ तारखेला होणाऱ्या १६व्या भारत-युरोपियन संघ शिखर परिषदेचे सह-अध्यक्षपदही ते भूषवणार आहेत.

प्रजासत्ताक दिनानिमित्त राष्ट्रपती भवनात होणाऱ्या विशेष अॅट होम स्वागत कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातल्या काही जणांना निमंत्रित करण्यात आलं आहे. नैसर्गिक शेती, जलसंवर्धन आणि ग्रामीण विकास क्षेत्रातल्या विशेष कामगिरीबद्दल नेरळचे चंद्रशेखर भडसावळे, नाशिकच्या योगविद्या धामचे योगगुरू विश्वास मंडलिक आणि राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम केल्याबद्दल मुंबईच्या रामनारायण ठाकूर महाविद्यालयाची विद्यार्थिनी इरम शेख यांना या कार्यक्रमाचं निमंत्रण देण्यात आलं आहे.

****

देशभरात आज ७८वा सैन्य दिवस साजरा करण्यात आला. या दिनानिमित्त आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी देशातले सर्व सैनिक, माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांना शुभेच्छा दिल्या. यानिमित्त जयपूर इथं आज सेनादलाचं संचलन पार पडलं. भारतीय सैन्यदलाच्या जवानांनी विविध कवायतींमधून शिस्त, सामर्थ्य आणि लष्करी क्षमतांचं यावेळी प्रदर्शन केलं. लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांच्या हस्ते हुतात्मा सैनिकांच्या कुटुंबियांना पदक देऊन सन्मानित करण्यात आलं.

****

धाराशिव जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक निर्णय अधिकारी तथा धाराशिवचे उपविभागीय अधिकारी ओमकार देशमुख यांनी आज पत्रकार परिषद घेतली. धाराशिव तालुक्यात जिल्हा परिषदेचे १२ गट आणि पंचायत समितीच्या २४ गणांसाठी २७४ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया होणार असल्याचं देशमुख यांनी सांगितलं.

****

भारतीय खुल्या बॅटमिंटन स्पर्धेत आज लक्ष्य सेननं जपानच्या खेळाडूचा पराभव करत, पुढच्या फेरीत प्रवेश केला. किदंबी श्रीकांत, एच एस प्रणॉय तसंच मालविका बनसोड यांना मात्र पराभवाचा सामना करावा लागला.

****

देशातून निर्यात होणाऱ्या मालाची उलाढाल गेल्या डिसेंबरमधे ३८ अब्ज ५० कोटी अमेरिकन डॉलर्सवर पोहोचली आहे. या महिन्यात आयातीत वाढ होऊन ती ६३ अब्ज ५५ कोटी अमेरिकन डॉलर्सवर पोहोचली. केंद्रीय वाणिज्य सचिव राजेश अग्रवाल यांनी ही माहिती दिली.

****